# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर-वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. १३८ दिनांक २७/०५/२०२१

## बॅग लिफ्टींग करणारे ३ आरोपीतांना तात्काळ अटक
## तुळींज पोलीस स्टेशनची कारवाई

तुळींज पोलीस ठाणे येथे तक्रारदार नामे श्री.उमंग रोहीत सोनी, वय-२८ वर्षे, व्यवसाय- डिलेव्हरी बॉय नोकरी, रा. सि/१०६, पहीला मजला गोवींदा पार्क संदिप हाईटस यशवंतगौरव जवळ, नालासोपारा प. ता. वसई, जि. पालघर यांनी तक्रार दिली की, २०/०५/२०२१ रोजी दुपारी ०३.०० वा. सुमारास शॉप नं. १५ वेद अपा. ९० फिट रोड प्रगतीनगर पोलीस चौकी जवळ, नालासोपारा (पुर्व). येथे दारुचे बॉटलची होम डिलेव्हरी करणे करीता येथे गेले असता तीन अज्ञात इसमांनी आपसात संगणमत करुन दोन वेगवेगळया मोटार सायकलवर येवुन टि.व्ही.एस.कंपनीच्या अपाचे मोटार सायकलवर बसलेल्या इसमाने तक्रारदार यांचे ताब्यातील १०,०६५ रुपये किंमतीच्या दारूच्या बॉटलची बॅग जबरदस्तीने हिसकावुन घेवुन चोरुन नेले असले बाबत तक्रार दिल्याने तुळींज पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर I ६४९/२०२१ भा.द..वि.कलम ३९२,३४ प्रमाणे दिनांक २०/०५/२०२१ रोजी २२.५० वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हा उघडकीस येण्याच्या दृष्टिने तुळींज पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने त्वरीत घटनास्थळाची पाहणी करुन गुप्त बातमीदारांना माहीती देऊन मिळालेल्या माहीती वरुन दिनांक २०/०५/२०२१ रोजी आरोपी १) अखीलेश तिलकधारी सिंग,वय-३८ वर्षे, धंदा- नोकरी, रा.रुम नं ३०२ भगवती अपार्टमेंन्ट नाईंटी फिट रोड प्रगतीनगर रोड नालासोपारा पुर्व ता.वसई जि पालघर २) हरीकेश अभिराम तिवारी,वय-२५ वर्षे, धंदा- नोकरी, रा.रुम नं ११० मौर्या अपार्टमेंन्ट प्रगतीनगर नालासोपारा पुर्व ता.वसई जि पालघर. ३) राहूल जियालाल गैड वय २५ वर्षे रा. रूम नंबर ३०४, जिवदानी अपार्टमेन्ट ९० फिट रोड नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर यांना अटक करून त्यांचे कडून गुन्हयातील चोरीस गेलेल्या ८७६५/- रुपये किमतीच्या दारूच्या बॉटल व गुन्हा करतांना वापरलेली ५०,०००/- रुपये किंमतीची जुपीटर मोटारसायकल असे एकूण ५८,७६५ /- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पो.उप आयुक्त परि.मंडळ -२, श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त. यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राजेंद्र कांबळे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, तुळींज पोलीस ठाणे, सपोनी संदेश पालांडे, मिथुन म्हात्रे, पो.उपनि. ज्ञानेश्वर कोकाटे, सहापोउपनि बाळु बांदल, शिवानंद सुतनासे, अनिल शिंदे, पो.ना. सावदेकर, आनंद मोरे, शेखर पवार, पो.शि. योगेश नागरे, सुखराम गडाख, शशीकांत पोटे, विनायक राऊत, यांनी केलेली आहे.